M.S.DIS.COM.LTD
O&M Circle Jalgaon
I.W No.- 400
Date- 29 AUG 2005
E.E.(O)
A.O.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित
कामगार विभाग, प्रकाशगड, प्लॉट जी-९,
बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
क्र.: कामगार विभाग/अ/ 26594
दिनांक : 10-08-2005.

# परिपत्रक

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीत कार्यरत असणा-या बहुतेक कामगार संघटना विविध कारणांसाठी स्थानिक कार्यालयांसमोर द्वारसभेचे आयोजन करीत असतात. काही वेळेला अशा द्वारसभेचे रुपांतर संबंधित अधिका-यास घेराव घालणे व तत्संबंधांच्या आंदोलनामध्ये परिवर्तीत होत असते. द्वारसभेचे आंदोलन हे मध्यंतरीच्या जेवणाच्या सुटीच्या वेळेतच झाले पाहिजे, तथापि, जेवणाच्या सुटीच्या कालावधीत बहुतेक द्वारसभांची सांगता केली जात नाही. बहुतेक वेळेला अशा द्वारसभेचे आयोजन हे वेळेनंतर अर्धातास, एकतास पर्यंत नियमबाह्यपणे चालू असते. तसेच काही वेळेस द्वारसभेत चांगल्या वर्तणूकीचे तारम्यही पाळले जात नाही उलट काही अधिका-यांना वैयक्तिक दुषणे देणे, आर्वाच्य भाषेत/एकेरी भाषेत बोलणे/असभ्यतेचे वर्तन केले जाणे इ. गोष्टी होतात. जेणे करुन कंपनीची जनमानसातील प्रतिमा मलिन होते. अशा वर्तनाने कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम तर होतोच शिवाय त्यावेळेस कामावर असलेल्या कर्मचा-यांच्या मानसिकतेवरही त्याचा परिणाम होतो आणि त्यामुळे कार्यालयाचे एकुणच कामकाज (Work Culture) बिघडण्याची शक्यता अधिक असते.

अशा प्रकारे कार्यालयीन वेळेत उपरोक्त प्रकारचे वर्तन करणे हे असभ्य असून गैरशिस्तीत मोडणारे आहे. मंडळाच्या विभाजनानंतर अशी परिस्थिती बदलवून कंपनीस आर्थिकदृष्ट्या सुदृढ करण्याबरोबर आम जनतेला उत्तम सेवा देण्यासाठी आपण करीत असलेल्या प्रयत्नांना खीळ बसू नये म्हणून सर्व क्षेत्रीय अधिका-यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) ज्या संघटना अशा प्रकारच्या द्वारसभा व तत्सम प्रकारच्या आंदोलनांचे आयोजन करतात अशा कामगार संघटनांच्या प्रतिनिधींना यापुढे चर्चेसाठी बोलावले जाणार नाही, अशा प्रकारची समज देऊन याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

२) कामावर आल्यानंतर मध्यंतरीच्या विश्रांती व्यतिरिक्त कर्मचारी त्यांच्या नियोजित कामाच्या जागेवर न आढळल्यास अशा कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

D:\Meena\on\dvarsabha paripatrak.doc

---- 2

LIR file

३) द्वारसभा वेळेत पूर्ण न झाल्यास अशा द्वारसभेत सहभागी झालेले कर्मचारी / अधिकारी यांचे नियमाप्रमाणे आंशिक वेतन कपात (Proportionate Wage Deduction) करण्यात यावे.

अशा प्रकारे केलेल्या कारवाईचा वृत्तांत मुख्य कार्यालयास त्वरीत कळविण्यात यावा.

हे परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक (वितरण कंपनी) यांच्या मंजूरीने प्रसृत करण्यात येत आहे.

सही/-
१२-८-०४
मुख्य औ.स. अधिकारी
(म.रा.वीज वितरण कं.मर्या.)

प्रत :
सर्व क्षेत्रीय अधिकारी / कार्यकारी अभियंता व तत्सम वरिष्ठ अधिकारी.

क्र. अअ/जळगांव/कावि/ No 02580 दिनांक - 8 SEP 20

प्रति
१) प्रविभाग सचिव, एस. ई. ए. जळगांव
२) प्रविभाग सचिव, कामगार महासंघ, जळगांव
३) प्रविभाग सचिव, नागरी कामगार युनियन, जळगांव
४) प्रविभाग सचिव, स्वतंत्र राष्ट्रीय विद्युत कर्मचारी संघटना, चाळीसगाव
५) प्रविभाग सचिव, वर्कर्स फेडरेशन, मु.पो. कोहरी, ता. पाचोरा
६) प्रविभाग सचिव, मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, जळगांव
७) प्रविभाग सचिव, मागासवर्गीय बहुजन विद्युत कामगार फेडरेशन,

D:\Meena\om\dvarsabha paripatrak.doc

Superintending Engineer
M.S.E.B., C.O. Jalgaon.